
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 10 एप्रिल 2026 | अंक क्र. 321 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# भक्ती, शिस्त आणि सामाजिक एकतेचे प्रतीक : गहिनीनाथ गडाचा म्हसोबाची वाडी येथे 94 वा नारळी सप्ताह उत्साहात संपन्न

## मी येथे मुख्यमंत्री म्हणून नाही, तर एक भाविक अनुयायी म्हणून आलो आहे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





■ आष्टी प्रतिनिधी

संत वामनभाऊ महाराजांनी सुरू केलेली नारळी सप्ताहाची महान परंपरा केवळ धार्मिक सोहळा नसून, ती समाज घडविण्याचे एक महापीठ आहे. ९४ वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे आणि तितक्याच शिस्तीत सुरू असणे, हे भक्तीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. "मी या ठिकाणी राज्याचा मुख्यमंत्री म्हणून नाही, तर गहिनीनाथ महाराजांचा एक नम्र अनुयायी म्हणून नतमस्तक होण्यासाठी आलो आहे," अशा भावूक शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांच्या जन्मगावी, म्हसोबावाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथे आयोजित ९४ व्या नारळी सप्ताहाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी गडाच्या विकासासाठी रस्ते आणि इतर सोयीसुविधांसाठी सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. विशेष म्हणजे, या सप्ताहाचे नियोजन २०३९ पर्यंत पूर्ण झाले असल्याने, या अभूतपूर्व शिस्तीची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये व्हावी, अशी इच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

गहिनीनाथ गड मुख्यमंत्र्यांनी दत्तक घ्यावा आणि हा सोहळा कायमस्वरूपी शासनाच्या यजमान पदाखाली व्हावा: पंकजा मुंडे कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आणि राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आपल्या भाषणात गहिनीनाथ गडाच्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, "हा सप्ताह वारकरी संप्रदायाची अस्मिता आहे. गहिनीनाथ गडाचा हा ऐतिहासिक नारळी सप्ताह कायमस्वरूपी मुख्यमंत्र्यांच्या यजमानपदाखाली साजरा व्हावा आणि मुख्यमंत्र्यांनी हे श्रद्धास्थान दत्तक घ्यावे," अशी आग्रही मागणी त्यांनी व्यासपीठावरून केली. यावेळी त्यांनी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या गडाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या आठवणींनाही उजाळा दिला.





### राजकीय नेत्यांची मांदियाळी आणि भक्तीचा महाकुंभ

■ या पवित्र सोहळ्याचा समारोप गुरुवारी (दि. ९) काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी व्यासपीठावर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती होती: धनंजय मुंडे (आमदार): "हा सप्ताह महंत विठ्ठल महाराज यांच्या जन्मगावी होत आहे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. गेल्या २५ वर्षांपासून या सप्ताहात पूजेचा मान मिळणे हे माझे भाग्य आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले. सुरेश धस (आमदार): त्यांनी नगर-बीड महामार्गाच्या कामासाठी भरीव निधीची मागणी करत, परिसरातील अपघातांच्या गंभीर प्रश्नाकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, साहेबराव दरेकर, बाळासाहेब आजबे, प्रताप ढाकणे, सरपंच शिवा शेकडे यांसह अनेक मान्यवर आणि हजारो भाविक उपस्थित होते.

### वारकरी शिस्तीचे दर्शन

■ संत वामनभाऊ महाराजांचा वारसा सांगणाऱ्या या सप्ताहासाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून लाखो भाविकांनी हजेरी लावली होती. म्हसोबावाडी परिसर विठ्ठल-रखुमाई आणि गहिनीनाथ महाराजांच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देत या ९४ व्या नारळी सप्ताहाची अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सांगता झाली.

# कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी परळी : अंबेजोगाई महामार्ग ठप्प!

## राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वात तीव्र 'रास्ता रोको', शेकडो शेतकऱ्यांचे रस्त्यावर येऊन आंदोलन केले

■ परळी (प्रतिनिधी):

कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी तातडीने नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी आज, ९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून परळी-अंबेजोगाई महामार्गावरील जिरेवाडी बायपास येथे शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग घेत तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन केले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार पक्ष) चे प्रदेश सरचिटणीस तथा कन्हेरवाडीचे मा. सरपंच राजेभाऊ फड यांच्या पुढाकाराने झालेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

कन्हेरवाडी परिसरातील गावांतील वाढती पाणीटंचाई लक्षात घेता, कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. याचा फायदा कन्हेरवाडी, जिरेवाडी, बँक कॉलनी, जलालपूर, ब्रह्मवाडी यासह परिसरातील भागांना होणार आहे.

तसेच यामुळे परिसरातील विहिरी व कूपनलिकांची पाणीपातळी वाढण्यास मदत होऊन जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. त्यामुळेच पाणी सोडावे यासाठी यापूर्वीच पत्र व्यवहार करण्यात आला होता. संबंधित विभागाकडून सातत्याने वेळकाढू धोरण अवलंबले जात होते. प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेचा निषेध करण्यासाठी आणि पाण्याचा हक्क मिळवण्यासाठी आज परिसरातील शेतकरी थेट रस्त्यावर उतरून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार पक्ष) चे प्रदेश सरचिटणीस तथा कन्हेरवाडीचे मा. सरपंच राजेभाऊ फड यांच्या सोबत रास्ता रोको आंदोलन केले.

'पाणी आमच्या हक्काचे .......', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. जोपर्यंत पाणी सोडण्याचा ठोस आणि लेखी निर्णय होत नाही, तोपर्यंत रस्ता मोकळा न करण्याचा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला होता.आंदोलनाची तीव्रता आणि वाढती गर्दी पाहता, पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

आंदोलकांच्या भावना आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी 20 एप्रिल पर्यंत पाणी सोडण्याचा निर्णय घेतला आणि तसे आश्वासन दिले. प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेनंतर साधारणतः तासभर चाललेले आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले आणि महामार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. या आंदोलनात कन्हेरवाडी, जिरेवाडी, बँक कॉलनी, जलालपूर, ब्रह्मवाडी यासह परिसरातील शेतकरी आणि नागरिक अभूतपूर्व संख्येने सहभागी झाले होते.





"कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी हा परिसरातील शेतकऱ्यांच्या आणि नागरिकांच्या जिवाभावाचा प्रश्न आहे. अनेकदा मागणी करूनही प्रशासन लक्ष देत नव्हते, म्हणून आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले. आज प्रशासनाने पाणी सोडण्याचे आश्वासन दिले आहे, जर त्याची अंमलबजावणी त्वरित झाली नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन केले जाईल." **- राजेभाऊ फड** (प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार पक्ष)

# संपादकीय

## आडवा टँकर

**१७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही? आधी 'इंडिगो' आणि आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघाती कोंडीने पायाभूत सुविधा खासगी संस्थांच्या हाती किती प्रमाणात द्याव्यात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगीकरणानंतरच्या या सेवांच्या कार्यक्षमतेचं गुलाबी चित्र रंगवताना बहुतांश वेळा पाश्चिमात्य देशातील खासगी सेवांचा दाखला दिला जातो. तो पूर्णांशाने नसला, तरी काही प्रमाणात खरा असतो. त्याला कारण आहे, तिथले नागरिक आणि ग्राहक हक्क, विमा कंपन्यांचा विस्तार आणि गरज पडल्यास त्यांचे कान धरण्यासाठी तत्पर न्यायव्यवस्था आहे. आपल्याकडे यातलं काहीच नाही. तरीही वेगाने खासगीकरण; काही क्षेत्रात तर मक्तेदारीकरण सुरू आहे. अगदी सुरुवातीलाच असे अनेक धक्के बसले आणि धोके स्पष्ट दिसत असले, तरी देशात कोणीच जागं व्हायला तयार नाही, असं दुर्दैवाने दिसतं आहे.**

**विविध क्षेत्रांतील खासगीकरणाचा टक्का वाढवताना त्या प्रमाणात नियंत्रक यंत्रणांना सक्षम आणि प्रभावी करणं आवश्यक आहे. आधी 'इंडिगो' आणि त्यानंतर मुंबई - पुण्यादरम्यानची वाहतूक कोंडी, नवी मुंबईतील नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर होत असलेली मोबाईल नेटवर्कची अडचण, खासगी बसचे देशभर सुरू असलेले भयानक अपघात... या मालिकेत भर टाकण्यासाठी आणखी कितीतरी दुर्घटना आहेत. पण, यातल्या कुठल्या घटनेने संबंधित क्षेत्राची नियंत्रण यंत्रणा बळकट केली गेली? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर देण्यासाठी मुद्दलात काहीही नाही! कफ सिरप प्रकरणातील एका बालकाचा २२८ दिवस झुंजल्यानंतर परवाच मृत्यू झाला. इतके बळी जाऊनही या प्रकरणात ज्या यंत्रणांनी डोळेझाक केली, त्यातल्या किती यंत्रणांवर कारवाई झाली? या यंत्रणांच्या नेहमीच्या निष्काळजीपणाला लोक आता सरावले आहेत. त्याबद्दल त्यांची तक्रार नाही. पण, जेव्हा अशा भयंकर दुर्घटना घडतात, तेव्हा त्याचं निमित्त करून तरी या यंत्रणांना; गलेलठ्ठ पगार आणि इतर कमाई करणाऱ्या त्यांच्या अधिकाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करा, एवढीच जनतेची माफक अपेक्षा आहे. मुंबई - पुणे वाहतूक कोंडीसाठी जबाबदार कोण? हेच अजून स्पष्ट होत नाही, यासारखं दुर्दैव नाही.**

**पायाभूत सेवांचा वेगाने विस्तार होतो आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. नवनवे प्रकल्प आखले जात आहेत, त्यांची भूमिपूजनं होत आहेत, त्यासाठी निधीच्या भरीव तरतुदी जाहीर होत आहेत, परदेशी गुंतवणुकीचा वाटाही वाढतो आहे, या सगळ्या कामगिरीबाबत समाधान म्हणूनच राज्यातल्या महायुती सरकारवर महाराष्ट्रातला मतदार पुनःपुन्हा विश्वास व्यक्त करतो आहे, महायुतीला निर्विवाद कौल देतो आहे. विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या या वेगामुळेच बहुसंख्य जनता केंद्रातल्या आणि राज्यातल्या सरकारची समर्थक झाली आहे. धोरणकर्ते देशाला नवनवीन स्वप्नं दाखवून त्याच्या अंमलबजावणीचे साक्षात्कार घडवत असताना या प्रकल्पांच्या दुरुस्ती, देखभालीची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणा जर गहाळ राहणार असतील, तर त्याचं खापर विनाकारण राजकीय नेतृत्वावरच फुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज्यातल्या सरकारने असे प्रसंग विशेष गांभीर्याने घेऊन असल्या निष्काळजी, गाफीलपणाची जबाबदारी शक्य तितक्या लवकर निश्चित करून संबंधितांवर कारवाई केली पाहिजे आणि ते लोकांच्या निदर्शनासही आलं पाहिजे. मुंबई - पुणे महामार्ग हा देशातील बहुचर्चित द्रुतगती महामार्ग आहे.**

**हा महामार्ग मुंबई आणि पुणे या देशातल्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडतोच; पण मुंबईचा दक्षिण भारताशी भूपृष्ठावरून संपर्क याच रस्त्याने होतो. रोज सरासरी ७० हजार वाहनं या महामार्गावरून प्रवास करतात. या ७० हजारांत छोट्या चारचाकी गाड्यांपासून मल्टी अॅक्सेल महाकाय मालट्रकचाही समावेश असतो. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ या महामार्गाची टोल वसुली एकाच कंपनीकडे आहे. ही कंपनी आता देशभर या स्वरूपाची आणखीही काम करते आहे. इतका अनुभव गाठीशी असल्यानंतर या महामार्गावरून कोणकोणत्या प्रकारची वाहतूक होते, त्यात काय जोखीम आहे, आपत्ती व्यवस्थापनाचे कोणते प्रश्न त्यातून निर्माण होऊ शकतात, याची माहिती या कंपनीकडे असायलाच हवी. हा महामार्ग ज्या सरकारी उपक्रमाच्या मालकीचा आहे, ते राज्य रस्ते विकास महामंडळ याबाबत अधिक जागरूक असायला हवं. दुर्घटना घडून २४ तास उलटून गेल्यानंतर आपल्या हालचालींची माहिती चार-पाचच काय, देशातल्या सगळ्या भाषांत दिली, तरी या महामंडळाची कार्यक्षमता त्याने पटवून देता येणार नाही!**

**प्रोपेनसारखा १७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही? या संदर्भातल्या मार्गदर्शक सूचना केवळ कागदांवर, फायलीत गुंडाळून ठेवण्यासाठीच आहेत का? रस्त्यात आडव्या झालेल्या या टँकरमुळे २०-२२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. अनेकांच्या आयुष्याची खोटी झाली. मालाचं प्रचंड नुकसान झालं. महानगरांची जीवनावश्यक पुरवठ्याची साखळी तुटली. ध्यानीमनी नसताना रस्त्यात अडकलेल्यांची अक्षरशः दैना झाली. याची नुकसानभरपाई कोणी कोणाला द्यायची? ज्यांनी अपघाताची कल्पना देऊन वेळीच वाहतूक रोखली नाही, त्यांच्या बेजबाबदारपणाची शिक्षा काय ठरवायची? निदान मुंबई, पुण्यातल्या जनतेला तरी आज हेच प्रश्न छळत आहेत. त्यांची उत्तरं जितक्या लवकर मिळतील, तेवढं बरं.**

# भाजपा सक्षम, मजबूत बुथची बांधणी करणार; कार्यकर्त्यांनी अपयशाचे आत्मपरीक्षण करावे

## भाजपाच्या प्रशिक्षण शिबिरात आ. रमेशअप्पा कराड यांचे प्रतिपादन

■ लातूर प्रतिनिधी

मागील काळात शासनाच्या विविध योजनेतून आणि आमदार फंडातून मोठ्या प्रमाणात निधी देऊन प्रत्येक गावागावात विकासाची कामे केली, असंख्य लाभार्थ्यांना वैयक्तिक योजनांचा लाभ दिला तरीही जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नाही या अपयशाचे भाजपा पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी आत्मपरीक्षण करावे असे सांगून येत्या तीन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातील प्रत्येक बूथ सक्षम आणि मजबूत करण्यासाठी नव्याने बांधणी केली जाणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी दिली.




रेणापूर ग्रामीण मंडल भाजपाच्या वतीने बुधवारी पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियाना अंतर्गत रेणापूर पिंपळफाटा येथील शामराव आकनगिरे कॉम्प्लेक्स येथे आयोजित प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपच्या महिला बालकल्याण सभापती सौ. शिवकन्या गोडभरले, माजी सभापती अनिल भिसे, प्रशिक्षण वर्ग जिल्हा संयोजक रोहिदास वाघमारे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, जिल्हाचिटणीस अॅड. दशरथ सरवदे, ओबीसी मोर्चाचे डॉ. बाबासाहेब घुले, पंस सदस्या सौ. अंजली काळे प्रशिक्षण वर्ग संयोजक मंडल अध्यक्ष शरद दरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण वर्गात १५५ भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बुथ प्रमुखांनी सहभाग घेतला.

भाजपाच्या कार्यकर्त्यांना पक्षाची शिस्त असावी, जबाबदारीचे भान असावे यासाठी प्रशिक्षण वर्ग आहे. भाजपा पक्ष जगातील सर्वात मोठा पक्ष असून पक्षा पेक्षा कोणीही मोठे नाही. असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी मेहनतीने कष्टातून रेणापूर तालुका भाजपाचा बालेकिल्ला निर्माण केला. प्रत्येक निवडणुकीत मोठे यश देणाऱ्या या तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत अपयश आले याची मोठी खंत व्यक्त करून मते का कमी मिळाली याचे प्रत्येकांनी आत्म परीक्षण करावे असे बोलून दाखवले.

अपयशातून यशाकडे जाण्यासाठी पुन्हा एकदा पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करावी लागेल. पक्षाच्या अपेक्षा पूर्ण करा, निश्चितपणे तुमच्या अपेक्षा पक्ष कधीही भंग होऊ देणार नाही. कार्यकर्त्यांना शंभर टक्के न्याय देणारा भाजपा पक्ष आहे. येत्या तीन वर्षात लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण बुथ यंत्रणा मजबूत आणि सशक्त करण्यात येणार असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, या पुढील काळात बुथ प्रमुख आणि शक्तीकेंद्र प्रमुखांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाईल. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा समाजातील प्रत्येक वंचित गोरगरीब नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत, शासनाच्या योजनाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पुढाकार घ्यावा भाजपाच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कामाचे भूमिपूजन आणि लोकार्पण करावे अशा सूचना आ. रमेशअप्पा कराड यांनी दिल्या.

या प्रशिक्षण शिबिरात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अंमलबजावणी, सोशल मीडिया यासह विविध विषयावर भाजयुमो जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, अॅड. दशरथ सरवदे, रोहिदास वाघमारे, दिलीप पाटील, चंद्रकांत कातळे, नवनाथ मुरकुटे यांनी सत्रातील विषयानुसार आपले विचार मांडले. प्रत्येक सत्रात सत्रप्रमुख म्हणून मान्यवरांची उपस्थिती होती.



# पाराजी बाळासाहेब चौरे यांची पुणे जिल्हा पोलीस पदी नियुक्ती; विविध मान्यवरांकडून जंगी सत्कार!

■ सिरसाळा/ अतुल बडे

नु कतीच पाराजी बाळासाहेब चौरे यांची पुणे जिल्हा पोलीस दलात महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असून, त्यांच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रशासकीय सेवेतील त्यांचा अनुभव आणि कर्तव्यनिष्ठा लक्षात घेता, त्यांच्या या नियुक्तीमुळे पोलीस दलाला अधिक बळकटी मि ळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.या सोहळ्याला सामाजिक आ णि राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज उप स्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने राम (दादा) किरवले प्रा. दयानंद झिंजुर्डे मधुकर किरवले संतोष किरवले (ग्रा.प. सदस्य) कॉ. प्रकाश उजगरे आकाश गायकवाड (वंचित बहुजन आघाडी, शहराध्यक्ष) गोरख काळे कल्याण काळे (माजी उपसरपंच) आकाश किरव ले यांच्यासह इतर अ ने क प्रतिष्ठित नाग रि क आ णि कार्यक र्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. "पाराजी बाळासाहेब चौरे यांच्या सारख्या अभ्यासू आणि कार्यक्षम अधिका ऱ्या ची पुणे जिल्ह्यात नियुक्ती होणे, ही अभिमानाची गोष्ट आहे," अशा भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या. का र्यक्रमाच्या शेवटी बाळासाहेब चौरे यांनी सत्काराला उत्तर देताना, आपल्या पदाच्या माध्यमातून जनसामान्यांना न्याय मिळवून देण्याचा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्या चा प्रयत्न करेन, असे आश्वासन दिले.




# समता बुद्ध विहार यांच्यावतीने संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन

■ घाटकोपर,(केतन भोज)

घाटकोपर पश्चिम इंदिरा नगर येथील समता बुद्ध विहार यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदा ही दि.१३ ते १६ एप्रिल या चार दिवसीय संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,भगवान गौतम बुद्ध,क्रांतीज्योती महात्मा जोतिबा फुले,छत्रपती शिवाजी महाराज,राजर्षी शाहू महाराज यांचा संयुक्त जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. यावेळी दि.१३ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे आगमन होणार असून दुसऱ्या दिवशी दि.१४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.त्यानंतर दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी.५.०० ते रात्री १०.३० वाजेपर्यंत अर्जुन ओव्हाळ आणि पार्टी यांचा भिम गीतांचा कार्यक्रम होणार आहे. तर दि.१६ एप्रिल रोजी सायंकाळी ७.०० ते १०.३० वाजेपर्यंत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या संयुक्त जयंती महोत्सव कार्यक्रमात सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती तसेच समता बुद्ध विहार,समता महाउपासिका संघ बहुउद्देशीय महिला मंडळ,पंचशील बुद्ध विहार,समता प्रतिष्ठान यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# लातूर शहरातील नव्याने विकसित होणाऱ्या भागाच्या नागरी सुविधांसाठी अतिरिक्त निधीची तरतुद करावी : स्थायी समिती सदस्य अनंत नवानाथ गायकवाड यांची मागणी

## लातूर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पावर स्थायी समिती बैठकीत अनंत गायकवाड यांची विविध कामांची मागणी

■ लातूर प्रतिनीधी

लातूर शहराचा वेगाने विस्तार होत असुन शहराच्या विविध भागांमध्ये नविन वसत्या विकसित होत आहेत. या नविन वसत्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध होणे आवश्यक असुन याबाबत नागरिकांकडून सातत्याने मागणी होत आहे याची विशेष दखल घेऊन नविन वसत्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अतिरिक्त निधीची तरतुद करावी अशी मागणी स्थायी समिती सदस्य अनंत नवानाथ गायकवाड यांनी केली आहे.





लातूर महानगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पाच्या मंजूरीसाठी पार पडलेल्या स्थायी समितीची बैठकीत सदस्य अनंत गायकवाड यांनी आपले मत व्यक्त करताना हि मागणी केली आहे. लातूर शहराच्या विविध भागांमध्ये अनेक नवीन वसत्या विकसीत होऊ लागल्या आहेत. या वसत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे होऊन नागरीकही वासत्व्यास येत आहेत. मात्र या वस्त्या नागरी सुविधांपासून वंचीत राहू लागल्या आहेत. या वसत्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे मनपाचे कर्तव्य आहे. या पार्श्वभूमिवर सदर निवीन वसत्यांचा स्वतंत्र विकास आराखडा तयार करुन नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आगामी अर्थसंकल्पात भरीव तरतुद करुन त्यासाठी अतिरिक्त निधी राखीव ठेवावा अशी मागणी अनंत गायकवाड यांनी केली आहे.

यासोबतच शहरातील नागरीकांना वेळेवर आणि माफक दरात आरोग्य सुविध उपलब्ध व्हाव्यात याकरीता शहराच्या विविध भागात नवीन रुग्णालय उभारणीसाठी निधीची तरतुद आवश्यक असल्याचे सांगून या करीता निधी राखीव ठेवण्यात यावा. शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकाची उभारणी व्हावी अशी मागणी या परिसरातील नागरीकांकडून होत असुन यापूर्वी याबाबत ठराव घेण्यात आल्याचे निदर्शनास आणुन देत या स्मारकाच्या उभारणीसाठी जागा व निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करुन त्या स्मारकाच्या सुशोभिकरणासाठी निधी राखीव ठेवण्यात यावा त्याच बरोबर शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सक्षम पाणी पुरवठ्यासाठी नवीन जलकुंभांची उभारणी करुन जलवाहिन्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी अनंत गायकवाड यांनी केली आहे.

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहून नागरीकांच्या सुरक्षीतेसाठी शहराच्या प्रमुख चौकासह संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा प्रस्ताव तयार करुन त्याकरीता आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद या अर्थसंकल्पात करावी अशी सुचना करुन सदस्य अनंत गायकवाड यांनी शहरातील चारही दिशेला नव्याने स्मशानभूमीचा विस्तार करण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे. मनपाच्या वतीने शहरात जलतरण तलाव उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करत मनपा हद्दीतील हरित पट्टयांचे संवर्धन व सुशोभीकरण यासाठी विशेष निधीची तरतुद करावी अशी आग्रही मागणी सदस्य अनंत गायकवाड यांनी केली आहे. या मागण्यांबाबत सभापती सचिन बंडापल्ले यांच्यासह मनपा प्रशासनाने सकारत्मकता दाखवत यासर्व मागण्यांचा विचार करुन यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतुद आगामी अर्थसंकल्पात करण्यात येईल असा विश्वास दिला आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)




## १२ एप्रिल रोजी अंबाजोगाई येथील विघ्नहर्ता डेंटल केअरचा "प्रथम वर्षपूर्ती सप्ताह" निमित्त विविध उपचारांवर २५ टक्क्यांपर्यंत सवलत


**अंबाजोगाई (प्रतिनिधी) :**

शहरातील नवाब नगर, मांडवा रोड परिसरातील डॉ.प्रणव प्रवीण उमराणे यांच्या विघ्नहर्ता डेंटल केअरचा प्रथम वर्धापन दिन १२ एप्रिल रोजी उत्साहात साजरा होणार आहे. गेल्या एका वर्षात रुग्णांना दर्जेदार व विश्वासार्ह दंतसेवा देत या दवाखान्याने अनेकांच्या चेहऱ्यावर सुंदर हास्य फुलवले आहे.

या वर्धापन दिनानिमित्त दि. १० एप्रिल ते १७ एप्रिल २०२६ दरम्यान "प्रथम वर्षपूर्ती सप्ताह" आयोजित करण्यात आला असून, या कालावधीत रुग्णांसाठी मोफत दंत तपासणी तसेच विविध उपचारांवर २५ टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत स्माईल डिझायनिंग, रूट कॅनाल ट्रीटमेंट, स्केलिंग (दात स्वच्छ करणे), इम्प्लांट्स व डेंचर्स, वाकडे दात सरळ करणे, अक्कल दाढ शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांसाठी विशेष दंतसेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचा व विशेष सवलतींचा अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा व 7666312701 या क्रमांकावर नोंदणी करून वरील उपचारांचा लाभ घ्यावा असे आवाहन विघ्नहर्ता डेंटल केअरतर्फे डॉ.प्रणव प्रवीण उमराणे यांनी केले आहे.





# संतांच्या सहवासात येणारा सामान्य माणूसही संत होतो : ना. पंकजाताई मुंडे

## भाविक भक्त हिच गडाची शक्ती लोकनेते मुंडे साहेब हे न विसरता येणारं तत्व

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संत वामनभाऊ महाराजांच्या ९४ व्या नारळी सप्ताहाची उत्साहात सांगता







**आष्टी | प्रतिनिधी**

लोखंडाला जेव्हा परीसाचा स्पर्श होतो तेव्हा त्याचं सोनं होतं अगदी त्याप्रमाणे एखाद्या संतांचा-महंताचा माणसाला स्पर्श होतो, तेव्हा तो माणूसही संत होतो, त्यात एकरूप होऊन जातो असे भावोद्गार राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई यांनी येथे काढले. सप्ताहाची परंपरा जोपासण्याचे काम भाविक भक्त करत असून तेच या गडाची शक्ती आहेत, असे सांगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी मला गडाच्या गादीचा सन्मान करण्याची शिकवण दिली, ते न विसरता येणारं तत्व आहे असंही त्या म्हणाल्या.

संत वामनभाऊ महाराज यांच्या ९४ व्या नारळी सप्ताहाची सांगता आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत म्हसोबाची वाडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली, त्यावेळी ना. पंकजाताई बोलत होत्या. आ. धनंजय मुंडे, आ. सुरेश धस, जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, भीमराव धोंडे, प्रताप ढाकणे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित भाविकांशी संवाद साधताना ना. पंकजाताई म्हणाल्या, मी याठिकाणी देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्री म्हणून नाही तर गहिनीनाथ गडाच्या प्रत्येक नारळी सप्ताहात यजमान म्हणून ते यावेत यासाठी गडाची एक भक्त म्हणून स्वागत करते. संत वामनभाऊ आपल्या सर्वांचे दैवत आहेत आणि ज्यांनी त्यांना दैवत मानले त्या लोकनेते मुंडे साहेबांचे स्थान आपल्या सर्वांच्या हृदयात आहे. कोणतेही संकट मग ते कोरोना, दुष्काळाचे असो की गारपिटीचे असो नारळी सप्ताहाची परंपरा जपण्याचे काम आपण सर्व भाविक भक्त करत आहात, आपणच गडाची ताकद आहात.

**■ मुंडे साहेब हे न विसरता येणारं तत्व**

मी माझ्या बाबांचे अंत्यसंस्कार करताना शपथ घेतली होती की, त्यांचे नाव जगाला विसरू देणार नाही. कारण गडाच्या गादीचा सन्मान करण्याची, संतांच्या विचारावर चालण्याची शिकवण त्यांनी मला दिली. दऱ्या- खोऱ्यात काम करणाऱ्या वंचित, उपेक्षित ऊस तोडणाऱ्यांच्या कष्टांना न्याय देण्याची, त्यांच्या हातात चार अधिकचे पैसे येण्याची शिकवण, तुमच्या लेकीचे शिक्षण फी-मुळे अडत असेल तर ती फी भरण्याची, गरीबाच्या लग्नाला मदत करण्याची दानत त्यांनी मला दिली म्हणून मी त्यांचे नाव जगाला विसरू देणार नाही. मुंडे साहेब हे न विसरता येणारं तत्व आहे. वरून देव जरी खाली आला आणि तुम्हाला म्हणाला, त्यांचे नाव विसर तरी तुम्ही ते विसरू शकणार नाहीत. त्यांना विसरणे म्हणजे तुम्हा आम्हाला दिलेले संस्कार, ओळख विसरण्यासारखे आहे असे ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

# "निरोगी मातेसाठी पोषण व तपासणी गरजेची" :प्रा डॉ विक्रम धन्वे



**सिरसाळा (अतुल बडे)**

श्री पंडितगुरू पार्डिकर महाविद्यालय, सिरसाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसाळा, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभाग व नॅक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "पोषण पंधरवडा" निमित्त एप्रिल २०२६ जनजागृती कार्यक्रम

मध्ये "गर्भवती महिलांच्या आरोग्यासाठी आहार व रक्त तपासणीचे महत्त्व" या विषयावर विशेष मार्गदर्शन व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. किशोरी कुलकर्णी यांच्या वतीने डॉ. प्रज्ञा मुंढे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, गर्भवती महिलेचे आरोग्य हे समाजाच्या प्रगतीचे प्रतिबिंब असून योग्य आहार व वेळोवेळी तपासणीमुळे माता व बालकाचे आरोग्य सुरक्षित राहते असे आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. के. पाटील होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, महाविद्यालय व आरोग्य विभागाच्या संयुक्त उपक्रमांमुळे समाजात आरोग्याविषयी सकारात्मक बदल घडू शकतो, असे प्रतिपादन केले. मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. विक्रम धन्वे, प्रा. डॉ. आनंद जाधव, प्रा. डॉ. उषा माने व श्रीमती अरुणा परदेशी यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. डॉ. विक्रम धन्वे यांनी आपल्या भाषणात गर्भवती महिलांच्या आहाराचे महत्त्व अधोरेखित करताना लोह, कॅल्शियम, फोलिक ॲसिड व प्रथिनयुक्त आहाराचे आवश्यकत्व स्पष्ट केले. तसेच नियमित रक्त तपासणीमुळे ॲनिमिया, मधुमेह, थायरॉइड यांसारख्या आजारांची वेळेवर ओळख होऊन प्रसूती सुरक्षित होते, असे त्यांनी सांगितले. "आई निरोगी तर बाळ निरोगी, आणि बाळ निरोगी तर राष्ट्र सुदृढ," हा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला. या कार्यक्रमास प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसाळा येथील कर्मचारी सचिन कांदे, सुनीता कंटेवाड तसेच मोठ्या संख्येने आशा कार्यकर्त्या, गर्भवती महिला व स्तनदा माता उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. जयदीप सोळंके यांनी केले, तर प्रास्ताविक प्रा. डॉ. अरुणा वाळके यांनी केले. आभार प्रदर्शन रोहिणी घाटूळ यांनी मानले. सदर कार्यक्रमामुळे परिसरातील महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन त्याचा निश्चितच सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# ज्ञानराधा मल्टीस्टेटचे कामकाज आता जिल्हा उपनिबंधक पाहणार; ठेवीदारांची सोय झाली : ॲड. अजित देशमुख

**बीड | प्रतिनिधी**

बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी ही संस्था अवसायनात आहे. या संस्थेचा कारभार छत्रपती संभाजी नगर येथून जिल्हा उपनिबंधक समर्थक जाधव हे पाहत होते. केंद्र शासनाच्या नव्या नियुक्तीनुसार आता बीडचे जिल्हा उपनिबंधक श्री. सतीश तोटावार हे अवसायक म्हणून कामकाज पाहणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील आणि जिल्ह्या बाहेरील ठेवीदारांना आता संपर्कासाठी सोयीचे होणार असल्याचे जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.



केंद्रीय निबंधक सहकारी संस्था, नवी दिल्ली यांनी दिनांक 03 मार्च 2026 रोजी अवसायकाचा पदभार हस्तांतरणाबाबत आदेश दिलेला आहे. या आदेशाप्रमाणे अवसायक म्हणून काम पाहत असलेले छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा उपनिबंधक श्री. सम्रत जाधव यांनी बीड येथील जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांच्याकडे दिनांक 8 एप्रिल 2026 रोजी पदभार सोपवला आहे. तोटावार यांनी या संस्थेचा चार्ज घेतला आहे.

जिल्ह्यात ठेविदारांची संख्या मोठी असल्याने आता जिल्ह्यातील ठेवीदारांना स्थानिक स्तरावर संपर्क करण्यासाठी सोपे होईल. या निमित्ताने तोटावार यांना देखील ठेवीदारांशी संवाद साधण्याची संधी निर्माण झाली आहे, असेही ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले.



## भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांच्या हस्ते
# बेलंबा येथे नवीन विहिरीचा शुभारंभ





## शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध — भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा खा डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली "शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शेतकऱ्याची प्रत्येक प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतोत. बेलंबा येथे विहिरीचा शुभारंभ होऊन त्यांच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. भविष्यातही शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध कामे प्राधान्याने राबविण्यात येतील." तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध राहूत असे प्रतिपादन भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी बेलंबा येथे विहिरीचा शुभारंभ प्रसंगी केले.

बेलंबा (ता. परळी वैजनाथ) येथे शेतकरी राजेभाऊ लहुदास गित्ते यांच्या शेतातील नवीन विहिरीचा शुभारंभ परळी वैजनाथ भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांच्या हस्ते नारळ वाढवून उत्साहात पार पडला. विहिरीच्या शुभारंभामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला पाण्याचा स्थिर स्त्रोत उपलब्ध होणार असून शेती विकासाला गती मिळणार आहे.

राजेश गित्ते यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना सक्षम करणे हेच भाजपा सरकारचे ध्येय आहे. ना.पंकजाताई मुंडे आणि मा. खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी देखील परळी वैजनाथ तालुक्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. पाण्याची उपलब्धता वाढवून शेती उत्पादन वाढविणे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे यासाठी नेहमीच प्रयत्न असतात. नवीन विहीर ही शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची सुविधा ठरणार असून यामुळे सिंचनाची सोय सुधारून पिकांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. हा उपक्रम इतर शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी आहे. या प्रसंगी गावातील नागरिक, शेतकरी बांधव व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत तनूष साहूचा रजत विजय



**अंबाजोगाई प्रतिनिधी**

नांदेड येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचा इयत्ता नववीचा विद्यार्थी तनूष शाम साहू याने डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत रजत पदक पटकावले आहे.

मुंबई येथील यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा येथे आयोजित भव्य समारंभात डीआरडीओचे वैज्ञानिक अशोक नगरकर आणि मधुबाला चिंचाळकर यांच्या हस्ते तनूष साहू याला द्वितीय क्रमांकाचे रौप्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेत महाराष्ट्रासह इतर राज्यांतील तब्बल १,०३,५८४ विद्यार्थ्यांनी पहिल्या फेरीत सहभाग नोंदवला होता. त्यापैकी ८,०४० विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले, तर अंतिम फेरीसाठी केवळ ८२० विद्यार्थ्यांची निवड झाली होती. या अत्यंत स्पर्धात्मक अंतिम फेरीत तनूष साहू याने उत्कृष्ट कामगिरी करत दुसरा क्रमांक पटकावला.

तनूष साहूच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत असून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

# इतिहासाशी छेडछाड खपवून घेणार नाही - जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण

## शालेय इतिहासाच्या पुस्तकांमध्ये मराठा साम्राज्याचा नकाशा पूर्ववत द्या ; आंदोलनाचा इशारा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात अलीकडे करण्यात आलेल्या बदलांमध्ये इतिहास विषयातून चक्क मराठा साम्राज्याचा नकाशाच वगळण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर इतिहासाशी छेडछाड खपवून घेणार नाही असा परखड इशारा जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी दिला. शालेय इतिहासाच्या पुस्तकांमध्ये मराठा साम्राज्याचा नकाशा पुन्हा समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने गुरूवारी जिल्हाधिकारी, बीड यांना निवेदन देण्यात आले.

अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी, बीड यांना गुरूवार, दिनांक 09 एप्रिल 2026 रोजी निवेदन देण्यात आले. सदरील निवेदन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्वीकारले. सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मराठा साम्राज्य हा केवळ ऐतिहासिक विषय नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व राष्ट्रीय अस्मितेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या




नेतृत्वाखाली उभारलेल्या स्वराज्याचा विस्तार विद्यार्थ्यांना नकाशाच्या माध्यमातून स्पष्टपणे समजणे आवश्यक आहे. मात्र, काही इयत्तांमधून हा नकाशा वगळण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या इतिहासाच्या आकलनावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता मराठा महासंघाने व्यक्त केली आहे. शालेय इतिहासाच्या पुस्तकांमध्ये क्यूआर कोड / ई-सामग्री आधारे नकाशाची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी, या विषयावर तज्ज्ञ समिती स्थापन करून अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सदरील निवेदन स्वीकारून याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच, या मागण्यांवर लवकरात लवकर निर्णय न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांच्या वतीने देण्यात आला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष आदिनाथ पिंगळे आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. मराठा साम्राज्य हा केवळ ऐतिहासिक विषय नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राष्ट्रीय अस्मितेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विशेषत: छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले स्वराज्य हे भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी आणि गौरवशाली पर्व आहे. या इतिहासाचे सुस्पष्ट आकलन विद्यार्थ्यांना व्हावे यासाठी नकाशा हा अत्यंत महत्त्वाचा व प्रभावी घटक आहे. नकाशाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मराठा साम्राज्याचा भौगोलिक विस्तार, राजकीय प्रभावक्षेत्र, तसेच ऐतिहासिक घडामोडी यांचे सखोल आणि दृश्यात्मक आकलन होते. नकाशा वगळल्यास विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता असून, विषयाची सखोलता कमी होऊ शकते. आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये दृश्यात्मक शिक्षणाला विशेष महत्त्व असल्याने, अशा घटकांचा समावेश आवश्यक आहे.

# भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे महागावात स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त भक्तिमय सोहळा महानैवेद्य आरती

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव येथे श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ९ एप्रिल ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसरात सध्या भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित महागाव केंद्र यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात दररोज विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, सकाळी १०.३० वाजता महानैवेद्य आरती आणि सायंकाळी ६.३० वाजता सायंआरती असा नियमित कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

गुरुवार, ९ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता महानैवेद्य आरती सौ. सुजाता सुधीर पोदुटवार यांच्या हस्ते संपन्न झाली, यावेळी






भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला.

यासोबतच स्वामी चरित्र पारायण, महाप्रसाद वितरण व विविध आध्यात्मिक उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. या सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सेवेकरी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

एकोणिसाव्या शतकातील दत्तसंप्रदायातील महान संत म्हणून ओळखले जाणारे श्री स्वामी समर्थ महाराज यांना भगवान दत्तात्रयांचा तिसरा पूर्ण अवतार मानले जाते. अक्कलकोट येथे दीर्घकाळ वास्तव्य करून त्यांनी भक्तांना मार्गदर्शन केले.

"भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" हा त्यांचा अभयमंत्र आजही भक्तांच्या जीवनाला प्रेरणा देत असून त्यांच्या कृपेमुळे भक्तांच्या जीवनात नवे बळ निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली जाते.

या पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने महागावातील पुसद रोडवरील केंद्रात दररोज भक्ती, सेवा आणि श्रद्धेचा अनोखा संगम अनुभवायला मिळत असून भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.